CMYK


विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासासाठी 'महावाचन उत्सव' >> पान 2

राजभवन येथील गणरायाचे कृत्रिम हौदात विसर्जन; राज्यपालांकडून बाप्पाला निरोप >> पान 3

समृद्धी महामार्गावर एकाच रात्री दोन अपघात; एक बर्निंग कारचा थरार >> पान 4


**सुविचार**

अपमानाच्या पायऱ्यावरुनच ध्येयाचा डोंगर चढायचा असतो.


# दैनिक आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 37 ■ शुक्रवार, दि. 13 सप्टेंबर 2024 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006


माकपचे नेते सीताराम येचुरी यांचं निधन



आतील पान

## 'मुख्यमंत्री योजनादूत' उपक्रमासाठी अर्ज करण्याची शुक्रवारी शेवटची संधी

### आतापर्यंत १ लाख २० हजाराहून अधिक उमेदवारांची नोंदणी

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : शासनाच्या विविध योजनांची सर्वसामान्य नागरिकांना माहिती देण्यासाठी मुख्यमंत्री योजनादूत उपक्रम सुरु करण्यात आला आहे. या उपक्रमासाठी अर्ज करण्याची शुक्रवार दि. १३ सप्टेंबर २०२४ ही शेवटची तारीख आहे. इच्छुक उमेदवारांनी www.mahayojanadoot.org या संकेतस्थळावर अर्ज करावा, असे आवाहन माहिती व जनसंपर्क महासंचालनालयामार्फत करण्यात आले आहे.

महाराष्ट्र शासनाच्या माहिती व जनसंपर्क महासंचालनालयामार्फत मुख्यमंत्री योजनादूत उपक्रम राबविण्यात येत आहे. प्रत्येक ग्रामपंचायत पातळीवर एक तर शहरी भागात प्रत्येक पाच हजार लोकसंख्येमागे एक अशा पद्धतीने राज्यात एकूण ५० हजार योजनादूतांची सहा महिन्यांसाठी निवड केली जाणार आहे. या योजनादूतांना दरमहा १० हजार रूपये मानधन दिले जाणार आहे. हे योजनादूत शासनाच्या लोककल्याणकारी योजनांबाबत नागरिकांना माहिती देतील. या उपक्रमासाठी आतापर्यंत १ लाख २० हजारांहून अधिक उमेदवारांनी नोंदणी केली आहे.



या योजनेत सहभागी होण्यासाठी इच्छुक उमेदवार १८ ते ३५ वयोगटातील असावा, उमेदवार कोणत्याही शाखेचा पदवीधर असणे आवश्यक आहे, उमेदवाराकडे महाराष्ट्राचे अधिवास प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. उमेदवारास संगणक ज्ञान असावे. त्याच्याकडे अद्ययावत मोबाईल (स्मार्ट फोन) आणि आधारसंलग्न बँक खाते असणे आवश्यक आहे. मुख्यमंत्री योजनादूत उपक्रमासाठी केलेला ऑनलाईन अर्ज, आधार कार्ड, पदवी उत्तीर्ण असल्याबाबतची पुराव्यादाखल कागदपत्रे / प्रमाणपत्र इ., अधिवासाचा दाखला. (सक्षम यंत्रणेने दिलेला), उमेदवाराकडे आधार जोडणी असलेल्या बँक खात्याचा पुरावा, पासपोर्ट आकाराचा फोटो, हमीपत्र (ऑनलाईन अर्जासोबतच्या नमुन्यामधील) नियुक्तीवेळी सादर करणे आवश्यक आहे. उद्या शुक्रवार दि.१३ सप्टेंबर २०२४ पर्यंत इच्छुक उमेदवारांना www.mahayojanadoot.org या संकेतस्थळावर नोंदणी करता येईल. योजनादूत पोर्टलवर ज्या उमेदवारांनी नोंदणी केली आहे अशा उमेदवारांनी Apply बटन दाबून अर्ज Submit करायला विसरू नये. तरच नोंदणीची प्रक्रिया पूर्ण होणार आहे.

## वैद्यकीय महाविद्यालयांना विद्यार्थ्यांकडून हमीपत्र लिहून घेण्याबाबत कोणतेही निर्देश नाहीत

### वैद्यकीय शिक्षण, संशोधन व 'आयुष'च्या आयुक्तांचे स्पष्टीकरण

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : शासकीय/महानगरपालिका/अनुदानित/खाजगी विनाअनुदानित आरोग्य विज्ञान अभ्यासक्रमांच्या सर्व महाविद्यालयांना विद्यार्थ्यांकडून कोणत्याही प्रकारचे हमीपत्र लिहून घेण्याबाबत निर्देश देण्यात आले नसल्याचे वैद्यकीय शिक्षण, संशोधन व 'आयुष'च्या आयुक्तांनी स्पष्ट केले आहे.

सक्षम प्राधिकाऱ्यांमार्फत राबविण्यात येणाऱ्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश घेणाऱ्या तसेच, विहित मार्गाने बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश घेणाऱ्या एससी, एसटी ओबीसी, ईडब्ल्यूएस प्रवर्गातील विद्यार्थ्यांकडून प्रवर्गातील ज्या विद्यार्थ्यांना व विद्यार्थिनींना १०० टक्के शिक्षण शुल्काची प्रतिपूर्ती अनुज्ञेय आहे, त्यांचेकडून प्रवेशाच्यावेळी कोणतेही शिक्षण शुल्क न आकारता त्यांना प्रवेश देण्यात यावा असे निर्देश देण्यात आले आहे.

ज्या विद्यार्थ्यांना ५० टक्के शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती अनुज्ञेय आहे, त्यांचेकडून फक्त ५० टक्के शिक्षण शुल्क घेऊन, त्यांना प्रवेश देण्यात यावा. शैक्षणिक संस्थांनी योजनेबाबतची माहिती सर्व विद्यार्थ्यांना देऊन संबंधित योजनेंतर्गत पात्र विद्यार्थ्यांना महाडीबीटी पोर्टलच्या वेळापत्रकानुसार अर्ज भरण्याबाबत कळवावे. सूचनांचे उल्लंघन करणाऱ्या संस्थांविरुद्ध कारवाई करण्यात येईल.

महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांपर्यंत पोहचण्याकरिता प्रयत्न करावेत. प्रथम वर्षाशिवाय इतर पुढील शैक्षणिक वर्षात प्रवेश घेणारे विद्यार्थी शिष्यवृत्तीकरिता पात्र असतील तर त्यांच्याबाबतही याप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी, असे संचालनालयामार्फत निर्देश देण्यात आले असल्याचे वैद्यकीय शिक्षण विभागाने कळविले आहे.

## भारतीय रेल्वेकडून गणेशोत्सव स्पेशल टूर, करा मुंबईसह हैद्राबाद, तिरुपतीची सफर

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : केवळ महाराष्ट्रातच नव्हे तर संपूर्ण देशभरात गणेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. मात्र महाराष्ट्रात या उत्सवाची धामधूम काही औरच असते. मुंबई ,पुणे , कोकण या भागातील गणेशोत्सव पाहण्यासारखा असतो . अशातच तुम्ही देखील मुंबईत गणेशोत्सवाचा आनंद घेऊ इच्छित असाल तर तुमच्यासाठी आनंदाची बातमी आहे. कारण खठउढउ कडून खास टूर पॅकेज नियोजित करण्यात आले आहे. चला जाणून घेऊया

मुंबई गणेश चतुर्थी टूर पॅकेज

मुंबई गणेश चतुर्थी टूर पॅकेज १२ सप्टेंबरपासून सुरू होत आहे. हे टूर पॅकेज १ रात्र आणि २ दिवसांसाठी आहे. या पॅकेजमध्ये कॅबने प्रवास करण्याची संधी असेल. पॅकेज फी दोन लोकांसोबत प्रवास करत असल्यास प्रति व्यक्ती पॅकेज फी रु १५९०० आहे. तीन लोकांसह प्रवास करण्यासाठी प्रति व्यक्ती पॅकेज शुल्क १५८०० रुपये आहे. तर मुलांसाठी पॅकेज फी १५००० रुपये आहे.

हैदराबाद आणि मुंबई टूर पॅकेज

या पॅकेजमध्ये तुम्हाला हैदराबाद आणि मुंबईला भेट देण्याची संधी मिळेल. हे पॅकेज १२ सप्टेंबरपासून सुरू होत आहे. पॅकेज छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, मुंबई, पुणे आणि सोलापूर येथून सुरू होत आहे. त्यामुळे तुम्ही या तिन्ही शहरांमधून या टूरमध्ये >> पान २

## मोदी सरकारकडून आजी-आजोबांना 'आयुष्मान' गिफ्ट; वयाच्या सत्तरीनंतर मोफत उपचार

नवी दिल्ली : ज्येष्ठ नागरिकांसाठी आनंदाची बातमी आहे. केंद्रीय मंत्री मंडळाने बुधवारी (११ सप्टेंबर २०२४) आयुष्मान भारत - पंतप्रधान जनआरोग्य योजना आता ७० पेक्षा अधिक वयाच्या ज्येष्ठ नागरिकांना लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. विशेष म्हणजेच सर्व उत्पन्न गटांतील ज्येष्ठांना या योजनेचा लाभ घेता येणार आहे. त्यामुळे आता या योजनेअंतर्गत ७० वर्षांपेक्षा जास्त वयाच्या नागरिकांवर मोफत उपचार केले जाणार आहेत.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी एप्रिल २०२४ मध्ये ७० पेक्षा अधिक वयाच्या ज्येष्ठ नागरिकांना आरोग्य विमा संरक्षण देण्यासाठी आयुष्मान भारत आरोग्य योजनेचा विस्तार



करण्याची घोषणा केली होती. त्यातच आता केंद्रीय मंत्री मंडळाने याबाबत निर्णय घेतला आहे. सुमारे ४.५ कोटी कुटुंबांना प्रति कुटुंब ५ लाख रुपयांचे मोफत आरोग्य विमा संरक्षण प्रदान करण्याचे या योजनेचं उद्दिष्ट असेल. ज्यामुळे सुमारे ६ कोटी ज्येष्ठ नागरिकांना फायदा होईल.

'७० वर्षे आणि त्याहून अधिक वयाच्या सर्व ज्येष्ठ नागरिकांना त्यांची आर्थिक स्थिती विचारात न घेता या योजनेचा लाभ घेता येणार आहे. पात्र ज्येष्ठ नागरिकांना नवीन स्वतंत्र कार्ड देण्यात येणार आहे. आधीच आयुष्मानच्या कक्षेत असलेल्या कुटुंबांना ७० वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांसाठी दरवर्षी ५ लाख रुपयांपर्यंत अतिरिक्त आरोग्य संरक्षण मिळेल,' असंही केंद्र सरकारच्या प्रसिद्धी पत्रकात स्पष्ट केलंय.

आयुष्मान भारत योजनेंतर्गत आता ७० किंवा त्यापेक्षा ज्यात वयाच्या ज्येष्ठांना प्रति वर्ष ५ लाख रुपये आरोग्य विमा संरक्षण देण्यात येणार आहे. मात्र, जे ज्येष्ठ नागरिक पहिल्यापासून केंद्र सरकारची आरोग्य योजना म्हणजेच सीजीएचएस, माजी सैनिक अंशदायी आरोग्य योजना म्हणजेच ईसीएचएस, आयुष्मान केंद्रीय सशस्त्र पोलीस दल म्हणजेच सीएपीएफ सारख्या अन्य सार्वजनिक विमा योजनांचा फायदा घेत आहेत, ते त्यांची विद्यमान योजना किंवा आयुष्मान भारत योजना निवडू शकतात.

याशिवाय ७० वर्षांपेक्षा जास्त वयांपेक्षा जास्त वय असलेले जे ज्येष्ठ नागरिक खासगी विमा पॉलिसी तसंच कर्मचारी राज्य विमा योजनेच्या अंतर्गत आहेत, ते देखील आयुष्मान भारत योजनेचा लाभ घेऊ शकतील, असंही सरकारनं स्पष्ट केलं आहे. सरकारनं घेतलेल्या या निर्णयामुळे ज्येष्ठांना दिलासा मिळणार आहे.

## पेट्रोल-डिझेल स्वस्त होणार; कधीपासून कमी होणार दर?

नवी दिल्ली : लवकरच पेट्रोल आणि डिझेलच्या किमती कमी होण्याची शक्यता आहे. सध्या अशी परिस्थिती निर्माण झाली आहे की, सर्वसामान्यांना इंधन दरवाढीत दिलासा मिळू शकतो. २०२१ नंतर प्रथमच ब्रेंट फ्युचर्स (क्रूड) प्रति बॅरल ७० डॉलर्सच्या खाली आले आहेत. सरकारी तेल कंपन्याही नफ्यात आल्या आहेत आणि हरियाणा व जम्मू काश्मीरमध्ये लवकरच निवडणुकाही होणार आहेत. या तीन कारणांमुळे पेट्रोल आणि डिझेलच्या किमती कमी होऊ शकतात.

ब्लूमबर्ग एनर्जी इंडेक्सनुसार, बुधवारी ब्रेंट क्रूडचे नोव्हेंबर फ्युचर्स प्रति बॅरल ६९.५८ डॉलर्सवर घसरले. डब्ल्यूटीआय क्रूड ऑक्टोबर फ्युचर्सची किंमतही प्रति बॅरल ६६.१८ डॉलर्स झाली. गेल्या वर्षी रशिया-युक्रेन युद्ध सुरू





झालं तेव्हा कच्च्या तेलाची किंमत प्रति बॅरल सुमारे १३० डॉलर्सवर पोहोचली होती. त्या तुलनेत आता कच्च्या तेलाची किंमत जवळपास निम्म्यावर आली आहे.

२०२४ या आर्थिक वर्षाच्या पहिल्या तिमाहीत सरकारी तेल कंपन्यांनी मोठा नफा कमवला आहे. तेल कंपन्या नफ्यात आहेत आणि कच्च्या तेलाच्या किमतीतही घसरण झाली आहे, अशा स्थितीत सरकार सर्वसामान्यांना महागड्या पेट्रोल आणि डिझेलपासून कधी दिलासा देणार? असा प्रश्न अनेकांना पडला आहे. या वर्षी मार्चमध्ये लोकसभा निवडणुकीपूर्वी पेट्रोल आणि डिझेलचे दर कमी करण्यात आले होते. तेव्हा तब्बल २२ महिन्यांनी पेट्रोल आणि डिझेलच्या किमती प्रत्येकी दोन रुपयांनी कमी करण्यात आल्या होत्या. दर कमी होऊन सहा महिने उलटले असून सरकारने त्यात अद्याप कोणताही बदल केलेला नाही. कधी कमी होणार किंमती?

सीएनबीसी टीव्ही १८ हिंदीने एनर्जी ॲनालिस्ट्सच्या हवाल्याने एक वृत्त प्रसिद्ध केलं आहे. त्यात म्हटलं आहे की, ब्रेंटच्या किमतींचा आणखी काही आठवडे आढावा घेतल्यानंतर सरकारी ऑइल मार्केटिंग कंपन्या पेट्रोल आणि डिझेलच्या किमती कमी करण्याचा निर्णय घेऊ शकतात. यंदा कच्च्या तेलाच्या किमतीत मोठ्या प्रमाणात चढ-उतार दिसले आहेत. भारताच्या एकूण गरजेपैकी ८७ टक्के तेल आयात केलं जातं. त्यामुळे भारतातील रिटेल फ्युएल किमती आंतरराष्ट्रीय तेलाच्या किमतींवर आधारित आहेत.

आंतराष्ट्रीय मार्केटमध्ये कच्च्या तेलाच्या किमती घसरल्यामुळे इंडियन ऑइल कॉर्पोरेशन लिमिटेड, भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड आणि >> पान २





## उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राच्या जनजागृतीसाठी फिरत्या रथाचा खेड तालुक्यात शुभारंभ

दैनिक आपला विदर्भ

**पुणे/प्रतिनिधी** आगामी विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने खेड-आळंदी विधानसभा मतदारसंघात इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र (ईव्हीएम) आणि व्हीव्हीपॅटबाबत जनजागृती आणि प्रात्यक्षिक करण्यात येणार असून त्यासाठी तयार करण्यात आलेल्या जनजागृती फिरत्या रथाचा शुभारंभ खेड तहसील कार्यालयाच्या आवारात उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांच्या हस्ते करण्यात आला.

राजगुरूनगर येथे झालेल्या या कार्यक्रमास आमदार दिलीप मोहिते पाटील, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी संतोष पाटील, अपर जिल्हाधिकारी अजय मोरे, उप विभागीय अधिकारी अनिल दौंडे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता मिलिंद बारभाई, तहसीलदार ज्योती देवरे, गटविकास अधिकारी विशाल





शिंदे, नगरपरिषदेचे मुख्याधिकारी अजिंक्य रणदिवे आदी उपस्थित होते.

मतदार संघातील कर्मचाऱ्यांना ईव्हीएम आणि व्हीव्हीपॅट यंत्राचे प्रात्यक्षिकाचे प्रशिक्षण देण्यात आले आहेत. ते सर्व मतदान केंद्रांतर्गत गर्दीच्या ठिकाणी, बाजारपेठ, मॉल आदी ठिकाणी ईव्हीएम आणि व्हीव्हीपॅट यंत्राबाबत प्रात्यक्षिके करुन दाखविण्यात येणार आहेत. अधिकाधिक नागरिकांनी यामध्ये सहभागी होऊन ईव्हीएम आणि व्हीव्हीपॅट यंत्राची प्रत्यक्ष हाताळणी करावी. यावेळी नागरिकांच्या शंकांचे निरसन करण्यात येईल. नागरिकांनी ईव्हीएम आणि व्हीव्हीपॅट यंत्राच्या प्रात्यक्षिकांचा लाभ घ्यावा, असे आवाहनही तहसील कार्यालयाच्या वतीने करण्यात येत आहे.

## 'थोरल्या पवारांपासून हिंदू धर्माला धोका'; भाजपचा गंभीर आरोप, नाशिकमध्ये पुकारलं आंदोलन

**नाशिक/प्रतिनिधी** : संभाजी ब्रिगेडच्या अधिवेशनामध्ये पत्रकार ज्ञानेश महाराव यांनी प्रभू रामचंद्र आणि श्री स्वामी समर्थांच्या संदर्भात आक्षेपार्ह वक्तव्य केले. यावेळी मंचावर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार उपस्थित होते. शरद पवारांनी सर्व विधानांना पाठींबा दिल्याचा आरोप करत भाजप आणि हिंदू संघटना शरद पवारांविरोधात आक्रमक झाल्याचे दिसून आले. नाशिकमध्ये शरद पवारांविरोधात जोरदार आंदोलन केले. यावेळी आध्यात्मिक आघाडीचे प्रमुख आचार्य तुषार भोसले यांनी शरद पवारांवर जोरदार हल्लाबोल केला.

भाजप आणि हिंदू संघटनांच्या वतीने आध्यात्मिक आघाडीचे प्रमुख आचार्य तुषार भोसले यांच्यासह साधु-महंतांच्या नेतृत्वात नाशिकच्या काळाराम मंदिरासमोर शरद पवारांविरोधात निषेध नोंदवण्यात आला. पाकिस्तान जसं आतंकवादी पोसतात, तसं शरद पवार हिंदू विरोधी विचार पोसत असल्याचा दावा तुषार भोसले यांनी केला आहे.

शरद पवारांपासून हिंदू धर्माला धोका >> पान २

CMYK

## एक गाव एक गणपती तंटामुक्त संकल्पना...

गणपती हे आराध्य दैवत म्हणून ओळखले जाते. भाद्रपद शुद्ध चतुर्थीला गगणाची विधिवत प्रतिष्ठापना करून मनोभावे पूजा केली जाते. गणेशोत्सवाचे महत्त्व लक्षात घेऊनच लोकमान्य टिळकांनी स्वातंत्र्यप्राप्तीसाठी लोकसहभाग महत्त्वाचा मानून त्याला सार्वजनिक रूप दिले. गणेशोत्सव म्हणजे आनंद, उत्साह, ऊर्जा, मराठी अस्मिता व परंपरा आणि भारतीय संस्कृतीचे प्रतीक असा सण आहे. कोणताही उत्सव साजरा करताना पर्यावरणाचा –हास होणार नाही, याची काळजी आपण सर्वांनी घेणे आवश्यक आहे. प्रत्येकाने आपला दृष्टिकोन पर्यावरणस्नेही ठेवला तरच उत्सव साजरे करण्याबाबत सामाजिक परिवर्तन होऊ शकेल. प्रत्येक सणानिमित्ताने घरामध्ये प्रसन्न वातावरण निर्माण होते. सध्या संपूर्ण देशात गणेशोत्सवाचे मंगलमय वातावरण आहे. ढोलताशांच्या गजरात श्री गजाननाचे आगमन झालेले आहे.. गौरीच्या स्वागताची तयारी सुरू झाली आहे. सध्या जागतिक तापमानवाढीमुळे निसर्गचक्र बदलत आहे. मान्सून चक्रेसुद्धा बदललेली आहे. महापूर, भूस्खलन यासारख्या समस्या वाढत आहेत. त्यामुळे प्रत्येक सण हे पर्यावरणपूरक कशा पद्धतीने साजरा करता येईल, हे सध्याच्या काळामध्ये योग्य आहे. गणेशोत्सव साजरा करीत असताना जलप्रदूषण, वायुप्रदूषण, ध्वनिप्रदूषण होणार नाही याची काळजी सर्वांनी घेणे अपेक्षित आहे. पर्यावरणपूरक गणेशोत्सव कशा पद्धतीने साजरा केला पाहिजे, यावर प्रत्येकाने बारकाईने लक्ष देणे आवश्यक आहे. एकाच गावात अनेक ठिकाणी गणरायाची विविध मंडळांद्वारे स्थापना केली जाते. मात्र खेडेगावात शांतता राखण्याच्या दृष्टीने 'एक गाव एक गणपती' उपक्रम राबविण्याचे आव्हान तंटामुक्त समित्यांपुढे उभे ठाकले आहे. गावातील तंटे गावातच सामोपचाराने मिटविण्यासाठी राज्य शासनाने महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहीम सुरू केली आहे. मागील सात वर्षात या मोहिमेला मोठे यशही मिळत आहे. गावातील तंटे गावात मिटवून शांतता व सुव्यवस्था निर्माण होत आहे. गणेशोत्सवाच्या काळात पोलिसांवर कायदा व सुव्यवस्थेचा मोठा तणाव असतो. यासाठी तंटामुक्त समितीने पुढाकार घेण्याची गरज आहे. एका गावात एकच गणपती स्थापन केल्यास गावातील शांतता भंग होणार नाही. हा प्रकार टाळण्यासाठी तंटामुक्त समित्यांनी पुढाकार घेऊन गावातील तरुणांचे प्रबोधन करणे गरजेचे आहे. गावात एकच गणपती असेल तर गटबाजी निर्माण होणार नाही. वादविवाद टाळले जातील. गावाची शांतताही भंग होणार नाही. परिणामी गावाची सामाजिक, सांस्कृतिक ओळख निर्माण होईल. यासाठी 'एक गाव एक गणपती' महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहीम ही लोकचळवळ होत आहे. पोलिस आणि महसूल प्रशासनाला खंबीरपणे या तंटामुक्त समित्यांच्या पाठीशी राहणे गरजेचे आहे. अनेक गावांनी एक गाव एक गणपती हा उपक्रम सुरू केला आहे. तंटामुक्त गाव समिती आणि गावकऱ्यांच्या सहकार्यातून प्रबोधनात्मक कार्यक्रमांनी गावकऱ्यांचे मतपरिवर्तन होईल, यात कुणालाही शंका नाही. राज्याचे तत्कालीन गृहमंत्री आर. आर. पाटील यांच्या संकल्पनेतून सुरू झालेल्या महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहिमेंतर्गत समित्यांनी एक गाव एक गणपतीची सुरुवात केली. आपल्या मंडळाचा देखावा आकर्षक असावा, आपल्याच कार्यक्रमांना लोकांनी प्रतिसाद द्यावा, आपल्या मंडळाची मूर्ती आकर्षक असावी अशा भावनेतून गणेश उत्सव मंडळांमध्ये चढाओढ असायची. यातूनच गावातील अनेक गणेश मंडळांचे वादविवाद होऊन गावची शांतता धोक्यात येत होती. राज्यात अनेक सेवाभावी संस्था गणेशमूर्तीची पर्यावरणपूरक निर्मिती करीत आहे. बुलढाणा जिल्ह्यातील पळसखेड सपकाळ ( ता. चिखली) येथील बेघर, निराश्रित मतिमंदांनी बनवलेले आकर्षक गणपती यावर्षी पहिल्यांदाच चिखलीच्या बाजारात दाखल झाले होते; ते स्वतःच्या घरी घेऊन जाण्यासाठी शहरातील नागरिकांनी एकच गर्दी केली होती. सोशल मीडियावर याची माहिती वाऱ्यासारखी पसरली होती. मनोरुग्णांसाठी केवळ सहानुभूतीची मदत मागण्यापेक्षा मेहनतीचे दाम मागावे आणि गणेश मूर्ती घेणाऱ्यांनी दान केल्याची भावना मनात जपावी, अशा दुहेरी– तिहेरी हेतूने हा सेवाव्रती डॉ. नंदू पालवे आणि त्यांच्या पत्नी आरती पालवे यांचा हा उपक्रम आहे. रस्त्यावर फिरणाऱ्या आणि घरच्यांच्या व समाजाच्या घृणेचे प्रतीक बनलेल्या स्वतःचे अस्तित्व हरवलेल्या त्या मनोरुग्णांना हक्काचा निवारा देण्याचे कार्य हे पालवे दाम्पत्य सेवासंकल्पच्या माध्यमातून करीत आहेत.

## वनराज आंदेकर प्रकरणात मोठी अपडेट समोर, ८ पिस्तुलांसह १३ काडतुसे जप्त, आणखी दोघांना अटक

**पुणे/प्रतिनिधी :** पुण्यातील राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी नगरसेवक वनराज आंदेकर यांच्या हत्या प्रकरणातील पळून गेलेल्या दोघांना गुन्हे शाखेने अटक केल्याची माहिती समोर आली आहे. वनराज आंदेकर यांच्या हत्या प्रकरणात आतापर्यंत तीन अल्पवयीनांसह २१ जणांना अटक केली आहे. आरोपींकडून आठ पिस्तूल, १३ काडतुसे, सात दुचाकी, मोटार देखील जप्त केली आहे. वनराज आंदेकर हत्या प्रकरणाचा मुख्य सूत्रधार सोमनाथ गायकवाड, शुभम दहिभाते, आंदेकर यांची बहीण संजीवनी कोमकर, तिचा पती, दीर, भाचा यांच्यासह इतरांना अटक करण्यात आलेली आहे. त्याचबरोबर हत्या करण्यासाठी कोयते, पिस्तूल पुरविणारा आरोपी संगम वाघमारे याला देखील अटक झाली आहे. त्यानंतर आता या घटनेनंतर पसार झालेला आरोपी सागर पवार, साहिल दळवी यांना गुन्हे शाखेच्या युनिट एकने आणि खंडणी विरोधी पथकाने काल (बुधवारी) रात्री उशीरा अटक केली आहे. त्याचबरोबर वनराज आंदेकर हत्या प्रकरणात प्रत्यक्षदर्शी साक्षीदार असलेला शिवम आंदेकर याच्या जीवाला धोका असल्याचं लक्षात घेऊन त्याला पोलीसांकडून संरक्षण देण्यात आलं आहे. रविवारी (१ सप्टेंबर) वनराज आंदेकर यांच्यावर नाना पेठ परिसरातील त्यांच्या घराजवळ पिस्तुलातून गोळ्या घालण्यात आल्या.

# विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासासाठी 'महावाचन उत्सव'








**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** व्यक्तिमत्व विकासाचे तसेच सृजनशीलता वाढीस लागण्याचे एक महत्त्वपूर्ण साधन म्हणजे वाचन! वाचनामुळे आनंद मिळतो. विद्यार्थ्यांना आनंददायी शिक्षण देण्यासाठी त्यांना पुस्तकांकडे आकर्षित करावे आणि लहान वयातच वाचनाची गोडी निर्माण करण्याच्या उद्देशाने शालेय शिक्षण विभागामार्फत महावाचन उत्सव २०२४ चे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमात ११ सप्टेंबर, २०२४ पर्यंत ९६,६३९ (८८.९५ टक्के) शाळांमधून १२,३०,५५७ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला असल्याची माहिती, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेच्या राज्य प्रकल्प संचालक आर. विमला यांनी दिली आहे.

मोबाईल, टीव्ही, संगणक आदी स्क्रीनच्या वेडामुळे हल्ली मुले वाचनाच्या आनंदापासून दूर जाताना दिसत आहेत. अशावेळी त्यांना पुन्हा पुस्तकांच्या सहवासात आणण्यासाठी शालेय शिक्षण विभागाने महावाचन उत्सव या उपक्रमाची सुरुवात केली आहे. हा उपक्रम २० सप्टेंबर, २०२४ पर्यंत सुरू राहणार आहे.

महावाचन उत्सवाचे ब्रँड ॲम्बेसेडर अमिताभ बच्चन

मागील वर्षी राज्यातील सर्व शाळांमध्ये 'महाराष्ट्रातील वाचन चळवळ' हा उपक्रम राबविण्यात आला होता. या उपक्रमामध्ये ६६ हजार शाळा व ५२ लाख विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. याची पडताळणी 'टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्स' मार्फत करण्यात आली होती. या उपक्रमास विद्यार्थ्यांचा मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळाला होता. हा प्रतिसाद लक्षात घेऊन सन २०२४–२५ या वर्षी देखील रिड इंडिया यांच्या सहकार्याने राज्यातील सर्व माध्यमांच्या व व्यवस्थापनाच्या शाळांमध्ये 'महावाचन उत्सव' राबविण्यात येत आहे. या उपक्रमाकरीता ज्येष्ठ अभिनेते अमिताभ बच्चन यांची ब्रँड ॲम्बेसेडर म्हणून निवड करण्यात असून त्यांनी देखील सर्वांना दररोज किमान १० मिनीटे नवीन काही वाचनाचे आवाहन केले आहे.

राज्यातील सर्व माध्यमांच्या व सर्व व्यवस्थापनाच्या शाळांमधील इयत्ता तिसरी ते बारावी इयत्तेतील सर्व विद्यार्थ्यांसाठी इयत्ता तिसरी ते पाचवी, सहावी ते आठवी व नववी ते बारावी असे तीन गट निश्रि्चत करण्यात आले आहे.

उपक्रमाची उद्दिष्टे

वाचन संस्कृतीला प्रोत्साहन देणे. विद्यार्थ्यांमध्ये अवांतर वाचनाची गोडी निर्माण करणे. मराठी भाषा, साहित्य, संस्कृतीशी विद्यार्थ्यांची नाळ जोडणे. दर्जेदार साहित्याचा व लेखक, कवींचा विद्यार्थ्यांना परिचय करुन देणे. विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासास चालना देणे. विद्यार्थ्यांच्या सृजनशीलतेला व भाषा संवाद कौशल्य विकासास चालना देणे ही या उपक्रमाची उद्दिष्टे आहेत.

उपक्रमाचे स्वरुप

या उपक्रमाच्या अंमलबजावणीसाठी www.mahavachanutsav.org या नावाने वेब प्लिकेशन विकसित करण्यात आले असून राज्यातील सर्व शाळा नोंदणी करीत आहेत. सहभागी विद्यार्थ्यांनी आवडत्या पुस्तकाचे वाचन करुन वाचन केलेल्या पुस्तकाविषयी अभिप्राय लेखन करावयाचे आहे. तसेच सहभागी विद्यार्थ्यांना वाचन केलेल्या पुस्तकाविषयी अभिप्राय देण्यासाठी एका मिनिटाचा व्हिडिओ/ ऑडिओ क्लिप अपलोड करण्याची सुविधादेखील उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

या उपक्रमासाठी महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेचे राज्य प्रकल्प संचालक हे राज्यस्तरीय नोडल अधिकारी असून जिल्हास्तरावर शिक्षणाधिकारी (प्राथमिक/ माध्यमिक) व तालुकास्तरावर गटशिक्षणाधिकारी यांच्यामार्फत हा उपक्रम राविण्यात येत आहे. बृहन्मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्राबाबत ही जबाबदारी संबंधित समकक्ष अधिकाऱ्यांची असणार आहे.

परिक्षण व पारितोषिके

विद्यार्थ्यांनी वाचन केलेल्या पुस्तकाबाबत लिखित स्वरुपात मांडलेल्या विचारांच्या आधारे मूल्यांकन करण्यात येऊन प्रत्येक स्तरावर प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाच्या विद्यार्थ्यांची निवड तीन गटांसाठी स्वतंत्रपणे करण्यात येणार आहे. विजयी विद्यार्थ्यांना पुस्तक स्वरुपात पारितोषिक तर सर्व विद्यार्थ्यांना सहभाग प्रमाणपत्र देण्यात येणार आहे.

ग्रंथ प्रदर्शन/ पुस्तक मेळाव्यांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना, पालकांना, शिक्षकांना नवनवीन पुस्तकांची माहिती मिळावी व वाचनास प्रोत्साहित करावे या उद्देशाने यावर्षी प्रत्येक तालुक्यात ग्रंथ प्रदर्शन / पुस्तक मेळावे घेण्यात आले आहेत. या मेळाव्यात त्या–त्या जिल्ह्यातील सार्वजनिक व खाजगी ग्रंथालयांना तसेच विविध प्रकाशकांना सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले असल्याची माहिती श्रीमती आर. विमला यांनी दिली आहे.

# 'एमपीएससी'च्या विद्यार्थ्यांची चिंता वाढणार, सर्वच परीक्षा लांबणार?

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्र सरकारने दिलेल्या मराठा आरक्षणाची अंमलबजावणी २६ फेब्रुवारीपासून करण्यात आली आहे. शासनाने तसा जीआर काढला असून अंमलबजावणीबद्दलच्या तरतुदी सांगितल्या आहेत. महाराष्ट्र राज्यातील सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागास वर्गाकरिता आरक्षण अधिनियम २०२४ नुसार 'सामाजिक आणि शैक्षणिक मागास वर्ग' निर्माण करण्यात आला आहे. त्यानुसार या वर्गासाठी १० टक्के आरक्षण देण्यात आले आहे. मात्र, हे आरक्षण लागू झाल्यानंतर त्याचा परिणाम एमपीएससीच्या विविध जाहिरातींवर झाला असून त्याचा परीक्षांवर काय परिणाम होणार याविषयी सविस्तर माहिती जाणून घेऊया.

परीक्षा लांबणीला सुरुवात

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने (एमपीएससी) महाराष्ट्र राजपत्रित नागरी सेवा संयुक्त पूर्व परीक्षा २०२४ साठी पुन्हा शुद्धिपत्रक जाहीर करून त्यामध्ये 'कुणबी नोंदी'च्या आधारे इतर मागासवर्गाचे (ओबीसी) जात प्रमाणपत्र असलेल्या उमदवारांना नव्याने अर्ज करण्याची संधी दिली. त्यामुळे पूर्व परीक्षा आता ६ जुलै ऐवजी २९ जुलैला घेण्यात येणार होती. शासनाने दिलेल्या सूचनांच्या आधारे 'एमपीएससी'ने हा निर्णय घेतला होता. त्यानंतर पुन्हा शुद्धीपत्रक काढून पुन्हा अर्जाची संधी देण्यात आल्याने त्याचा परिणाम परीक्षेवर पडून ती २५ ऑगस्टला होणार होती. मात्र, विद्यार्थी आंदोलनामुळे ती पुन्हा पुढे गेली.

ओबीसींच्या सवलती लागू

शासनाने अराखीव किंवा आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (ईडब्ल्यूएस) प्रवर्गातून अर्ज सादर केलेल्या उमेदवारांनी इतर मागास वर्गाचे जात प्रमाणपत्र प्राप्त केले असल्यास, अशा उमेदवारांचा इतर मागास वर्गाचा दावा मान्य करून तसेच सदर प्रवर्गातून नव्याने पात्र ठरलेल्या उमेदवारांना अर्ज सादर करण्याची संधी देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तसेच इतर मागासवर्गीयांकरिता लागू असलेल्या वयोमर्यादेतील सवलतींचा लाभ घेऊन वयोमर्यादा ओलांडली असतानाही नव्याने अर्ज करण्याची मुभा देण्यात आली आहे.

या कारणाने परीक्षा लांबणार

फेब्रुवारी २०२४ आधी एमपीएससीने विविध विभागांच्या जाहिराती प्रसिद्ध केल्या होत्या. विविध विभागांकडून आलेल्या मागणीपत्राच्या आधारे या जाहिराती प्रसिद्ध करून अर्जही मागवण्यात आले होते. मात्र, त्यानंतर मराठा आरक्षण लागू झाल्याने या विद्यार्थ्यांनाही पदभरतीचा लाभ मिळावा यासाठी सर्व जाहिराती परत पाठवून त्यांच्यामध्येही आरक्षण लागू केले जात आहे. याचा परिणाम सर्व पदभरतीवर होत असून विविध परीक्षा लांबण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

याचाही परीक्षांवर परिणाम होणार

पुढील काही महिन्यांत विधानसभेच्या निवडणुका असून आचारसंहिता लागू होणार आहे. त्याचा परिणाम या परीक्षांवर होणार आहे. कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्याने या काळात परीक्षा होणे अशक्य आहे.

पान १ वरून...

## भारतीय रेल्वेकडून गणेशोत्सव

सहभाग घेऊ शकता. हे टूर पॅकेज ४ रात्री आणि ४ दिवसांचे आहे. पॅकेजमध्ये ट्रेनने प्रवास करण्याची संधी असेल. या पॅकेजच्या फी बद्दल सांगायचे झाल्यास दोन लोकांसोबत प्रवास करत असल्यास प्रति व्यक्ती पॅकेज फी १९२०० रुपये आहे. तीन लोकांसह प्रवास करण्यासाठी प्रति व्यक्ती पॅकेज शुल्क १८५०० रुपये आहे. मुलांसाठी पॅकेज फी १४७०० रुपये आहे.भारतीय रेल्वेच्या अधिकृत वेबसाइटवरून तिकीट बुक करण्याची प्रक्रिया सोपी आहे.

मुंबई आणि तिरुपती टूर पॅकेज

खठ्ठढ्ढउ चे हे पॅकेज १५ सप्टेंबरपासून सुरू होत आहे. या पॅकेजमध्ये तुम्हाला मुंबई आणि तिरुपतीला भेट देण्याची संधी मिळेल. हे पॅकेज कल्याण, लोकमान्य टिळक, मुंबई, पुणे, सोलापूर आणि ठाणे येथून सुरू करण्यात येत आहे. हे टूर पॅकेज ३ रात्री आणि ४ दिवसांचे आहे. पॅकेजमध्ये कॅबने प्रवास करण्याची संधी असेल. पॅकेज फी दोन लोकांसोबत प्रवास करत असल्यास प्रति व्यक्ती पॅकेज फी ७३९० रुपये आहे. तीन लोकांसह प्रवास करण्यासाठी प्रति व्यक्ती पॅकेज शुल्क ७२९० रुपये आहे. मुलांसाठी पॅकेज फी ६५०० रुपये आहे. IRCTC टूर पॅकेजमध्ये उपलब्ध सुविधा वाचून तिकीट बुक करा.

## पेट्रोल-डिझेल स्वस्त होणार

हिंदुस्तान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड यांच्यासह इतर सरकारी ऑइल मार्केटिंग कंपन्यांना (ओएमसी) नफा झाला आहे. या आर्थिक वर्षाच्या पहिल्या तिमाहीत, तिन्ही सरकारी ओएमसींना एकत्रित ७ हजार ३७१ कोटी रुपये निव्वळ नफा मिळाला. कमी ग्रॉस रिफायनिंग मार्जिन (जीआरएम) आणि एलपीजी सिलिंडरच्या विक्रीवरील कमी वसुलीमुळे गेल्या वर्षीच्या तुलनेत या वर्षीच्या पहिल्या तिमाहीत कंपन्यांची कामगिरी खालावली होती. पण, गेल्या तिमाहीत कंपन्यांनी चांगला नफा कमवला आहे. शॅक्युइट रेटिंग्ज अँड रिसर्चमधील चीफ इकॉनॉमिस्ट आणि रिसर्च हेड सुमन चौधरी यांनी सांगितलं की, कच्च्या तेलाच्या किमती प्रति बॅरल ८० डॉलर्सच्या खाली राहिल्यास ओएमसींची आर्थिक स्थिती मोठ्या प्रमाणात सुधारेल. शिवाय, पेट्रोल–डिझेलच्या किमती कमी होण्याची शक्यता निर्माण होईल. हरियाणा आणि जम्मू–काश्मीरमध्ये होणाऱ्या विधानसभा निवडणुका विचारात घेऊनही याबाबत निर्णय घेतला जाऊ शकतो. ओएमसींनी लोकसभा निवडणुकीपूर्वी मार्चमध्ये देशभरात पेट्रोल आणि डिझेलच्या दरात प्रति लिटर दोन रुपयांची कपात केली होती.

## 'थोरल्या पवारांपासून हिंदू धर्माला

तुषार भोसले म्हणाले की, जो जो माणूस हिंदू धर्माचा अपमान करतो, तो तो माणूस शरद पवारांचाच माणूस असतो. जसा आतंकवाद पाकिस्तान पोसतो, तसा हिंदू विरोधी विचार आणि माणसं शरद पवार पोसतात. आयसीस, पीएफआयसारख्या संघटनांकडून हिंदू धर्माला धोका आहे. तसाच शरद पवारांपासून हिंदू धर्माला धोका आहे. हिंदू विरोधी विचार करण्याचे आणि त्याला बळ देण्याचे कार्य पवार करतात. हिंदू विरोधी वक्तव्य करणारा प्रत्येक माणूस शरद पवारांशीच कसा संबंधित असतो? असा सवाल त्यांनी यावेळी उपस्थित केलाय.

प्रवीण दरेकरांची शरद पवारांवर टीका

दरम्यान, शरद पवार यांनी सोमवारी सकाळी जावई सदानंद सुळे आणि नात रेवती सुळे यांच्यासह लालबागच्या राजाचे दर्शन घेतले. यानंतर भाजप नेते प्रवीण दरेकर यांनी एक व्हिडीओ पोस्ट करत शरद पवार यांच्यावर निशाणा साधला. त्यांनी म्हटलंय की, ज्ञानेश महाराव यांनी शरद पवार यांच्यासमोर प्रभू रामचंद्र, विठुराया आणि हिंदुत्त्वाचा अपमान केला. त्यावर काहीही न बोलता शरद पवार लालबागच्या राजाच्या दर्शनाला आले. निवडणुकीसाठी नौटंकी का होईना पण लालबागच्या राजाने शरद पवार यांना सुबुद्धी दिली. पण महाराष्ट्राच्या जनतेला ही ढोंगी श्रद्धा दिसून येत आहे, असे टीका प्रवीण दरेकर यांनी शरद पवारांवर केली.

# ''क्रोनोलॉजी समजून घ्या..'', पंतप्रधान मोदी – सरन्यायाधीश चंद्रचूड गणपती दर्शनावर संजय राऊतांची खोचक टीका

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बुधवारी (११ सप्टेंबर) रात्री सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश डीवाय चंद्रचूड यांच्या निवासस्थानी भेट दिली. यावेळी त्यांनी चंद्रचूड यांच्या घरातील गणपतीचे दर्शन घेतले आणि आरतीमध्ये सहभाग घेतला. सरन्यायाधीश चंद्रचूड आणि त्यांच्या पत्नी कल्पना दास यांनी मोदींचे स्वागत केले. त्यानंतर मोदींनी गणपतीचे दर्शन घेऊन आरतीमध्ये सहभाग घेतला.

पंतप्रधान मोदींनी याप्रसंगी मराठमोळा पोशाख परिधान केला होता. या घटनेनंतर आता सोशल मीडियावर संमिश्र प्रतिक्रिया येत आहेत. अनेकांनी या घटनेवर नापसंती व्यक्त केली आहे. तर काहीजणांनी या भेटीचा संबंध थेट महाराष्ट्रातील विधानसभेच्या निवडणुकांशी लावला आहे. सरन्यायाधीश चंद्रचूड हे महाराष्ट्रातून येतात. गणेशोत्सवा हा राज्यातील प्रमुख उत्सवांपैकी एक आहे.

संजय राऊत यांची टीका

शिवसेना उबाठा गटाचे नेते संजय राऊत यांनी या घटनेवर प्रतिक्रिया देताना सरन्यायाधीश चंद्रचूड यांचे नाव न घेता या भेटीवर आक्षेप व्यक्त केला आहे. मोदींच्या भेटीचा व्हिडीओ शेअर करत त्यांनी कॅप्शनमध्ये म्हटले, ''संविधानाच्या घरालाच आग लागली. घरातील दिव्याने, ईव्हीएमला क्लीन चीट दिली, महाराष्ट्रातील घटनाबाह्य सरकारच्या सुनावणीला तीन वर्षापासून तारीख पे तारीख सुरू, पश्चिम बंगाल बलात्कार प्रकरणात स्वत:हून हस्तक्षेप मात्र महाराष्ट्रातील बलात्कार प्रकरणात अवाक्षर काढले नाही, दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्या जामिनावर तारीख पे तारीखष्ठ हे का होत आहे? तुम्ही सर्व घटनाक्रम एकदा समजून घ्या.. भारत माता की जय''

सरन्यायाधीश निवृत्तीला आले, पण घटनाबाह्य सरकारबद्दल निर्णय कधी?

चंद्रचूड देशाचे सरन्यायाधीश असून ते नोव्हेंबरमध्ये निवृत्त होत आहेत. पंतप्रधान किती जणांच्या घरी गेले याची माहिती नाही. सरन्यायाधीशांच्या घरी ते गेले, आरती करत आहेत, त्यांचा संवाद पाहण्यात आला. धर्मनिरपेक्ष म्हणून घेणाऱ्या राष्ट्रात एक छान चित्र आम्हाला पाहायला मिळाले. खरं म्हणजे हे संविधानाला किंवा प्रोटोकॉलला धरून आहे का? याविषयी चर्चा झाली पाहिजे. महाराष्ट्रातील घटनाबाह्य सरकारच्या विरोधात आमची जी लढाई सुरू आहे त्यात न्याय का मिळत नाही किंवा तारखांवर तारीख का पडत आहे, आमच्या लोकांच्या मनात शंका आहे. हे का होतंय. सरन्यायाधीश चंद्रचुडांच्या पदावर असताना तीन वर्षे बेकायदा सरकार बसवले गेले. हे सरकार घटनाबाह्य आहे, असे सरन्यायाधीश सांगत नाहीत. ते आता निवृत्तीला आले आहेत. त्यामुळे याच्यामागे वेगळे काही घडतेय का? सरकार वाचवण्यासाठी किंवा शिवसेना आणि राष्ट्रवादीसारखे स्वाभीमानी पक्ष संपविण्यासाठी न्यायालयाची मदत घेतली जात आहे का? अशी शंका लोकांच्या मनात घट्ट झाली असल्याची टीका संजय राऊत यांनी केली.



वाईट संकेत जात आहेत

ज्येष्ठ वकील प्रशांत भूषण यांनीही या प्रकरणावर प्रतिक्रिया व्यक्त केली आहे. एक्स वर केलेल्या पोस्टमध्ये त्यांनी म्हटले. सरन्यायाधीश डीवाय चंद्रचूड यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींना आपल्या खासगी निवासस्थानी येण्यास मान्यता दिली, हे धक्कादायक आहे.

संविधानाने प्रदान केलेल्या नागरिकांच्या मूलभूत अधिकारांचे रक्षण करण्याची आणि सरकार संविधानाच्या मर्यादेत काम करत आहे की नाही? याची खात्री करण्याची जबाबदारी असलेल्या न्यायव्यवस्थेसाठी या घटनेतून अतिशय वाईट संकेत जात आहेत. त्यामुळेच न्यायपालिका आणि कार्यपालिका यांच्यात एका हाताचे अंतर असणे आवश्यक आहे, असे मत प्रशांत भूषण यांनी व्यक्त केले.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# राजभवन येथील गणरायाचे कृत्रिम हौदात विसर्जन; राज्यपालांकडून बाप्पाला निरोप

दैनिक आपला विदर्भ

■ उदय नरे

**मुंबई :** राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांच्या निवासस्थानी, राजभवन येथे स्थापन केलेल्या गणरायाचे बुधवारी (दि. ११) गणेशोत्सवाच्या पाचव्या दिवशी राजभवन येथे कृत्रिम हौदात विसर्जन करण्यात आले.

राज्यपालांनी कुटुंबातील सदस्य तसेच राजभवनातील अधिकारी व कर्मचारी यांच्यासह गणरायाची आरती केल्यानंतर बाप्पाला निरोप दिला. गणेशमूर्ती विसर्जन करताना पाणी प्रदूषित होऊ नये यासाठी मूर्तीचे समुद्रात विसर्जन न करता ते कृत्रिम हौदात करावे, अशी सूचना राज्यपालांनी केल्यामुळे मूर्तीचे विसर्जन हौदात करण्यात आले.





### नाशिक मध्यवर्ती कैद्यांनी तयारी केली शाडूची मुर्ती

राज्यपालांच्या निवासस्थानी मांडलेली गणेशाची मूर्ती शाडूची होती. ही मूर्ती नाशिक येथील कारागृहातील कैद्यांनी तयार केली होती. विसर्जनाच्या वेळी राज्यपालांचे प्रधान सचिव प्रवीण दराडे, सहसचिव श्वेता सिंघल, परिवार प्रबंधक जितेंद्र वाघ तसेच इतर अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## संक्षिप्त...

### गेल्या अनेक वर्षांपासून प्रत्येक सरकारने धनगर समाजाची फसवणूक केली आहे- राजू शेट्टी



दैनिक आपला विदर्भ

**पंढरपूर/प्रतिनिधी :** पंढरपूरमध्ये धनगर समाजाचा आरक्षणासाठी आमरण उपोषण सुरु आहे. आज या उपोषणाचा चौथा दिवस आहे. माजी खासदार राजू शेट्टी यांनी उपोषणकर्त्यांची भेट घेतली. आम्ही कुठल्याही आंदोलनामध्ये सहभागी असतो मग ते मराठा समाजाचे आंदोलन असो किंवा धनगर समाजाचे आंदोलन असो. गेल्या अनेक वर्षांपासून धनगर समाजाची एसटी प्रवर्गातून आरक्षणाची मागणी आहे. प्रत्येक सरकारने धनगर समाजाच्या आरक्षणाविषयी फसवणूकच केली आहे. सरकारने तातडीने लक्ष घालावे उपोषणकर्त्यांची तब्येत खालावली आहे अशी प्रतिक्रिया यावेळी माजीखासदार राजू शेट्टी यांनी दिली आहे.

### बेपत्ता तरुणाच्या आरोपीला पोलिसांनी ठोकल्या अवघ्या २४ तासाच्या आत बेड्या



दैनिक आपला विदर्भ

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी :**काही दिवसांपूर्वी बेपत्ता झालेल्या तरुण राजेश विजय कापसे याचा शिर नसलेला मृतदेह पोलिसांच्या हाती लागला होता. राजेशच्या मारेकऱ्यांना पकडण्यात पोलिसांना मोठे यश आले आहे. मृतदेह मिळताच अवघ्या २४ तासाच्या आत मारेकरांच्या पोलिसांनी मुसक्या आवळल्या आहेत. संतोष जगताप असे आरोपीचे नाव असून दुसऱ्या आरोपीला देखील लवकरात लवकर अटक करण्यात येईल, अशी ग्वाही पोलीस अधीक्षक विनायक कुमार राठोड यांनी दिली आहे.

### सीएम एकनाथ शिंदे यांच्या निवासस्थानी वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमचे संस्थापक प्रा. क्लॉस श्वाब यांनी सपत्नीक घेतले गणेशाचे दर्शन



दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :**मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे शासकीय निवासस्थान वर्षा येथील श्री गणेशाचे वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमचे संस्थापक तथा कार्यकारी अध्यक्ष प्रा. क्लॉस श्वाब व त्यांच्या पत्नी श्रीमती हिल्डे श्वाब यांनी दर्शन घेतले. यावेळी श्वाब दाम्पत्याच्या हस्ते श्री गणेशाची आरती करण्यात आली. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी श्वाब दाम्पत्याचा पारंपरिक रितीने सत्कार केला. याप्रसंगी खासदार डॉ. श्रीकांत शिंदे, खासदार मिलिंद देवरा, गृह विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव डॉ आय.एस.चहल , मुख्यमंत्र्यांचे अतिरिक्त मुख्य सचिव विकास खारगे आदी मान्यवरउपस्थितहोते.

### दीपिकाने १० पुरुषांसोबत लग्न केलं, सर्वांवर बलात्काराचा आरोप ठेवला; विवेकच्या तक्रारीनंतर न्यायालयही भडकले

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** रोज न्यायालयात वेगवेगळे प्रकरण समोर येतात. पण कर्नाटक उच्च न्यायालयासमोर एक हैराण करणारं सुनावणीस आलं आणि पुढे काय करावं हेच कुणाला सुचना. एका महिलेने १० लोकांच्या सोबत लग्न केलं, त्यांच्यासोबत शारीरिक संबंधही प्रस्थापित केले. पण आता तिने त्या दहाही पुरूषांवर बलात्काराचा आरोप ठेवला. हे प्रकरण ज्यावेळी कर्नाटक उच्च न्यायालयात गेलं त्यावेळी न्यायाधीश चांगलेच भडकले. संबंधित महिलेची माहिती राज्यातील सर्व पोलिस स्टेशनमध्ये द्यावी आणि या महिलेची तक्रार पुन्हा आली तर ती घेऊ नये असे निर्दे श त्यांनी राज्याच्या पोलिस महानिरीक्षकांना दिले. दीपिका असं त्या महिलेचं नाव आहे. न्यायमूर्ती एम नागप्रसन्ना यांनी कर्नाटकातील हासन जिल्ह्यातील सकलेशपूरमधील कॉफी बागेचे मालक असलेले विवेक आणि त्यांच्या परिवारातील सदस्यांच्या विरोधात सुरू असलेला खटला रद्द करण्याचे निर्देश दिले आहेत. कोडागू जिल्ह्यातील कुशालनगरमध्ये राहणारे विवेक आणि दीपिका यांची ऑगस्ट २०२२ मध्ये एका व्यावसायिक कारणाच्या निमित्ताने भेट झाली होती. त्यानंतर त्यांचा संपर्क वाढत गेला आणि त्याचे रुपांतर प्रेमात झालं.

### मुंबईकरांच्या 'बेस्ट' बचाव अभियानाचे देखाव

**मुंबई/प्रतिनिधी :** बेस्ट प्रशासनाने गणेशोत्सवापूर्वी 'बेस्ट बचाव अभियान' अधिकाधिक मुंबईकरांपर्यंत पोहोचावे, यासाठी सार्वजनिक गणेश मंडळांना साद घातली होती. त्यामुळे मुंबईतील अनेक गणेशोत्सव मंडळांनी 'बेस्ट' उपक्रमाला पाठिंबा देत 'बेस्ट' बचाव अभियानाचे देखावे साकारले आहेत. बेस्ट उपक्रमाच्या स्वमालकीच्या बसचा कमी होत चाललेला ताफा आणि अल्पदरात उपलब्ध होणाऱ्या सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेला लागलेली घरघर याबाबत जनजागृती करणारे फलक आणि आकर्षक देखावे साकारण्यात आले आहेत.

मुंबईकरांना विनाअडथळा वाहतूक सेवा देण्यासाठी 'बेस्ट' उपक्रमाच्या ताफ्यात स्वमालकीच्या किमान ३,३३७ बस आवश्यक आहेत. मात्र, सध्या बेस्ट उपक्रमाकडे स्वामालकीच्या १,०७८ म्हणजेच केवळ ३३ टक्के बस शिल्लक आहेत. नव्या गाड्या वेळेत खरेदी करण्यात आल्या नाहीत. तर बेस्टची सार्वजनिक परिवहन सेवा डिसेंबर २०२५ नंतर संपुष्टात येऊ शकते. त्यामुळे मुंबईकरांच्या साथीने बेस्ट बचाव अभियान सुरू करण्यात आले आहे. कुर्ला येथील 'शिवशक्ती मित्र मंडळा'तर्फे बेस्ट बचाव अभियानाचा आकर्षक देखावा साकारला आहे. शिवाय, कुर्ला येथील क्रांतिनगर सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ, बैल बाजार येथील सर्वोदय मित्र मंडळ, कुर्ला येथील तानाजी मित्र मंडळ, बजरंग सेवा संघ, कोपरखैरणे येथील एकदंत सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ, माटुंगा येथील प्रगती नगर गणेशोत्सव मंडळ यांसह मुंबई, ठाणे, नवी मुंबईतील अनेक मंडळांनी बेस्ट बचाव अभियानाचे फलक मंडपात उभारले आहेत.

### विघ्नहर्ता गणेश मंडळाच्यावतीने नगरपंचायत सफाई कमचारी महीलाना साडी चोळी वाटप



दैनिक आपला विदर्भ

■ प्रकाश भुरे

**मालेगाव :** मालेगाव येथील विघ्नहर्ता गणेश मंडळाच्या वतीने व विघ्नहर्ता फाउंडेशन तर्फे मालेगाव नगरपंचायत मालेगांव चे सफाई माहिला कर्मचारी यांना साडी चोली व पुरुष कर्मचारी यांना शॉल व श्रीफल देवून मा. तहसीलदार साहेब,ठाणेदार साहेब यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला मालेगांव शहराला स्वच्छ ठेवण्याचे काम हे कर्मचारी करत असतात त्याच्यामुळेच आज आपले आरोग्य चांगले राहाते,समाजातत्यांना पाहण्याच्या दृष्टिकोन बदलण्यासाठी हा सत्कार करण्यात आला कार्यक्रमला उपस्थित म्हणुन प्रमुख पाहुणे मा ना तहसीलदार करंगळे साहेब मा. मालेगाव पोलीस स्टेशन चे ठाणेदार चौधरी साहेब धोत्रे साहेब पोलीस कर्मचारी व नगरपंचायत चे अधिक्षक गवळी साहेब इतर अधिकारी व विघ्नहर्ता फांउडेशन चे कार्यकते उपस्थीत होते

## सोयाबीनला सहा हजार रुपयांचा भाव द्या !

### पातुरच्या तहसीलदारांना शेतकऱ्यांचे निवेदन

दैनिक आपला विदर्भ

■ नासीर शेख



**पातूर :** सोयाबीनला सहा हजार रुपये भाव देऊन सरकारी खरेदी सुरू करा अशा मागणीचे निवेदन पातुर तालुक्यातील शेतकरी राजा ग्रुप यांच्या मार्गदर्शनात तहसीलदारांना नुकतेच देण्यात आले आहे. सोयाबीन हे पीक महाराष्ट्राचे मुख्य पीक असल्याने पातुर तालुक्यातील बहुसंख्य शेतकरी सोयाबीन पेरणीला पसंती देतात, परंतु दिवसेंदिवस खत बियाणे मशागती आदी महागाई मोठ्या प्रमाणात वाढली आहे. परंतु गेल्या दहा वर्षापासून सोयाबीन पिकांचे भाव जैसे थे आहे.अस्मानी संकटामुळे सोयाबीनच्या उत्पादनात मोठ्या प्रमाणात घट होत आहे. गेल्या दहा वर्षांपूर्वी सोयाबीनला जे भाव होते. ते भाव आज सुद्धा तेच आहे. त्यामुळे आजच्या तुलनेत सोयाबीन पेरणीपासून काढणी पर्यंतचा खर्च सुद्धा निघत नाही, त्यामुळे सोयाबीनला सहा हजार रुपये क्विंटल भाव देऊन सरकारी खरेदी करा अशा मागणीचे निवेदन पातुर तालुक्यातील शेतकरी राजा ग्रुप यांच्या वतीने तहसीलदारांना दिले आहे.

## युझवेंद्र चहलने ९ विकेट घेऊन संघाला मिळवून दिला विजय, कारकिर्दीत पहिल्यांदाच केला हा पराक्रम

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** युझवेंद्र चहलला टीम इंडियाकडून बऱ्याच दिवसांपासून एकही सामना खेळता आलेला नाही. पण आता त्याने इंग्लंडच्या काउंटी चॅम्पियनशिपमध्ये मोठी कामगिरी केली आहे. इंग्लंडमध्ये नॉर्थम्प्टनशायरकडून खेळताना त्याने शानदार गोलंदाजी केली आणि डर्बीशायरविरुद्ध ९ विकेट घेत आपल्या संघाला १३३ धावांनी बंपर विजय मिळवून दिला. त्याने संपूर्ण सामन्यात ९९ धावांत ९ बळी घेतले. त्याची आतापर्यंतची कारकिर्दीतील ही सर्वोत्तम गोलंदाजी कामगिरी आहे. या सामन्यात चहलने आपल्या प्रथम श्रेणी कारकिर्दीत १०० बळी घेण्याचा पराक्रमही केला.

नॉर्थहॅम्प्टनशायरने या हंगामात काउंटी चॅम्पियनशिपमध्ये पहिला विजय नोंदवला आहे. यात युझवेंद्र चहलचे महत्त्वाचे योगदान होते. पहिल्या डावात त्याने ४५ धावांत ५ बळी घेतले होते, तर दुसऱ्या डावात ५४ धावांत ४ बळी घेतले होते. त्याच्या घातक गोलंदाजीमुळे फलंदाजांच्या अपयशानंतरही त्याच्या संघाने अवघ्या ३ दिवसांत १३३ धावांनी मोठा विजय नोंदवला. त्यांचा संघ पहिल्या डावात अवघ्या २१९ धावांत सर्वबाद झाला होता. यानंतर चहलने ५ बळी घेत १६५ धावा करत डर्बीशायरला बॅकफूटवर ढकलले.

चहलच्या घातक गोलंदाजीमुळे नॉर्थम्प्टनशायरच्या संघाला ५४ धावांची आघाडी मिळाली. नॉर्थम्प्टनशायरचे फलंदाज दुसऱ्या डावातही फ्लॉप ठरले. संपूर्ण संघ पुन्हा २११ धावांवर ऑलआऊट झाला. आता चहलच्या संघाकडे एकूण २६५ धावांची आघाडी होती. यानंतर दुसऱ्या डावात त्याने रॉबर्ट केओघसह शिकारीला सुरुवात केली आणि डर्बीशायरला गुडघे टेकण्यास भाग पाडले. या दोघांनी ९८ धावांत ९ बळी घेत नॉर्थम्प्टनशायरला १३३ धावांचा बंपर विजय मिळवून दिला.

जे काम युझवेंद्र चहल भारतात कधीच करू शकला नाही, ते काम त्याने इंग्लंडमध्ये केले आहे. त्याने संपूर्ण सामन्यात ९९ धावांत ९ विकेट घेतल्या, ही त्याच्या कारकिर्दीतील सर्वोत्तम गोलंदाजीची कामगिरी आहे. टीम इंडिया किंवा भारतातील घरच्या मॅचमध्ये तो कधीही अशी कामगिरी करू शकला नाही.

यासोबतच चहलने ३८ प्रथम श्रेणी सामन्यांमध्ये एकूण १०६ विकेट घेतल्या असून तो टीम इंडियाच्या कसोटी संघाचे दार ठोठावत आहे. मात्र, एवढी चांगली गोलंदाजी करूनही त्याला अद्यापही टीम इंडियासाठी कसोटी पदार्पण करता आलेले नाही.

## १४ सप्टेंबर रोजी जिओ पारसी कार्यशाळेचे आयोजन

### पारशी समुदायासह केंद्रीय अल्पसंख्याक मंत्री साधणार संवाद

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** केंद्र शासनाच्या अल्पसंख्याक कार्य मंत्रालयाद्वारे यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान सभागृह मुंबई येथे शनिवार १४ सप्टेंबर २०२४ रोजी सकाळी ११.०० ते दु. ३.३० वाजेपर्यंत जिओ पारसी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी केंद्रीय अल्पसंख्याक व्यवहार मंत्री किरेन रिजिजू, राज्याचे अल्पसंख्याक विकास मंत्री अब्दुल सत्तार हे समुदायाशी संवाद साधणार आहेत.

पारशी लोकसंख्या स्थिर करण्यासाठी आणि भारतातील पारशी लोकसंख्या वाढवण्याच्या उद्देशाने केंद्राने जिओ पारसी योजना सुरू केली. पारशी जोडप्यांना वैद्यकीय आणि समुदायाचे आरोग्य (क्जउ) घटकांतर्गत आर्थिक सहाय्य प्रदान करण्यात येते. राज्य शासनाद्वारे बायोमेट्रिक प्रमाणीकरण आणि इतर पडताळणीनंतर योजनेतील मदत थेट लाभ हस्तांतरण (उ्इढ) मोडद्वारे नागरिकांना जारी केली जात आहे. योजनेची माहिती समुदायातील जास्तीत जास्त नागरिकांपर्यंत पोहोचावी यासाठी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.पारशी मुख्य धर्मोपदेशक उदवाडाचे श्री. दस्तूरजी आणि राष्ट्रीय अल्पसंख्याक आयोगाचे अध्यक्ष इकबाल सिंह लालपुरा, उपाध्यक्ष केरसी के. देबू उपस्थित राहणार आहेत. पारशी समुदायातील नागरिकांनी यांचा लाभ घ्यावा असे आवाहन अल्पसंख्याक विकास विभागाने केले आहे.

# माकपचे नेते सीताराम येचुरी यांचं निधन; वयाच्या ७२ व्या वर्षी घेतला अखेरचा श्वास

दैनिक आपला विदर्भ




**मुंबई/प्रतिनिधी :** माकपचे नेते सीताराम येचुरी यांचे वयाच्या ७२ व्या वर्षी निधन झाले. ते बऱ्याच दिवसांपासून आजारी होते. सीताराम येचुरी हे एक्यूट रेस्पिरेटरी ट्रॅक्ट इंफेक्शनने त्रस्त होते. त्यांना १९ ऑगस्टला दिल्लीतील एम्स रुग्णालयात दाखल करण्यात आलं होतं. तेव्हापासून एम्स रुग्णालयात त्यांच्यावर उपचार सुरु होते. अखेर आज त्यांची प्राणज्योत मालवली आहे.

सीताराम येचुरी हे भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे (मार्क्सवादी) सरचिटणीस आणि पक्षाच्या संसदीय गटाचे नेते होते. त्यांचा जन्म १२ ऑगस्ट १९५२ रोजी चेन्नई येथे तेलुगू भाषिक ब्राह्मण कुटुंबात झाला. येचुरी १९७४ मध्ये स्टुडंट्स फेडरेशन ऑफ इंडिया मध्ये सामील झाले आणि एका वर्षानंतर, ते भारतीय कम्युनिस्ट पार्टी (मार्क्सवादी) मध्ये सामील झाले. १९८४ मध्ये त्यांना सीपीआय(एम) च्या केंद्रीय समितीमध्ये समाविष्ट करण्यात आले. २०१५ मध्ये त्यांची पक्षाच्या सरचिटणीसपदी निवड झाली. १९९२ पासून ते CPI(M) च्या पॉलिट ब्युरोचे सदस्यही होते. त्यांना २०१६ मध्ये राज्यसभेत सर्वोत्कृष्ट संसदपटू पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. आणीबाणीच्या काळात जेएनयूमध्ये असताना त्यांना अटक करण्यात आली होती. यानंतर ते सलग तीन वेळा जेएनयू विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष म्हणून निवडून आले.

काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी सीताराम येचुरी यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त केला. त्यांनी ट्विट करत म्हंटल, सीताराम येचुरीजी माझे मित्र होते. ते भारताच्या कल्पनेचे संरक्षक होते आणि त्यांना आपल्या देशाची सखोल माहिती होती. मी आमच्या प्रदीर्घ चर्चांना आता मुकणार आहे. या दु:खाच्या वेळी त्यांचे कुटुंबीय, मित्र आणि अनुयायांप्रती माझ्या मनः पूर्वक संवेदना.असं म्हणत राहुल गांधी यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

## वृत्तविशेष...

### रिंकू राजगुरूचा एक डायलॉग ऐकण्यासाठी तरुणांची अफाट गर्दी



दैनिक आपला विदर्भ

**यवतमाळ/प्रतिनिधी :** दारव्हा तालुक्यातील देऊळगाव वळसा येथील महालक्ष्मी मंदिरात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी सैराट फेम रिंकू राजगुरू खास आकर्षणाचा केंद्रबिंदू होती. तिची एक झलक बघता यावी, यासाठी दिग्रस मतदारसंघातून हजारोंची गर्दी उसळली होती. यावेळी तिने आपला मराठीत कळत नाही, इंग्रजीत सांगू का, हा एकच डायलॉग उपस्थितांना ऐकवला. त्यालाही तरुणाईने उस्फूर्त असा प्रतिसाद दिला.

### गणेश उत्सवानिमित्त प्रसिद्ध युवा उद्योजक निर्माते अतुल ठाकूर यांचे जाहीर व्याख्यान

दैनिक आपला विदर्भ



**डोणगाव/प्रतिनिधी :** डोणगाव परिसरात नावाजलेला शिवाजीनगर , पळसकर गल्ली येथील बालगोपाल पाटील गणेश मंडळ नेहमीच आपल्या आगळ्यावेगळ्या स्वरूपाने व नवनवीन उपक्रमांनी नावाजलेले आहे.यावर्षी बालगोपाल पाटील गणेश मंडळाचा ५० वर्ष पूर्ण झाली हा सुवर्ण महोत्सव असल्याने दहा दिवस विविध कार्यक्रमाची रेलचेल आहे अशातच ग्रामीण भागातील युवकांना मार्गदर्शन म्हणून व आर्थिक साक्षरता व ग्रामीण महाराष्ट्र या विषयावर सखोल मार्गदर्शन करण्यासाठी सुप्रसिद्ध युवा उद्योजक निर्माते अतुल ठाकूर सर रा.छत्रपती संभाजीनगर यांच्या व्याख्यानाचे आयोजन शनिवार दिनांक १४ सप्टेंबर रोजी शिवाजीनगर पळसकर गल्ली येथे बालगोपाल पाटील मंडळाच्या वतीने आयोजित करण्यात आले आहे तरी डोणगाव व परिसरातील युवकांनी नागरिकांनी तसेच युवा उद्योजकांनी या व्याख्यानासाठी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे .

### मलायकाच्या वडिलांनंतर २६ वर्षांच्या प्रसिद्ध अभिनेत्याचा मृत्यू, १० दिवसांपासून होता बेपत्ता

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** अभिनेत्री मलायका अरोराच्या वडिलांनी आत्महत्या करत आयुष्य संपवलं ही बातमी ताजी असताना दुसरीकडे प्रसिद्ध टेलिव्हिजन अभिनेत्याचा मृतदेह सापडल्याची माहिती समोर आली आहे. टेलिव्हिजन सीरिज कोमो डाइस एल डिचोमधून प्रसिद्ध मिळवणारा अभिनेता जेम्स हॉलक्रॉफ्ट याचा मृतदेह सापडला आहे. ३ सप्टेंबर २०२४ पासून तो बेपत्ता होता. त्याची बहिण जेन हॉलक्रॉफ्ट हिनं इन्स्टाग्राम पोस्टच्या माध्यमातून ही माहिती चाहत्यांना दिली आहे. त्याचबरोबर तिन एक भावुक पोस्ट लिहित श्रद्धांजली वाहिली आहे.

जेम्स हॉलक्रॉफ्टच्य बहिणीनं लिहिलेल्या पोस्टमध्ये तिनं म्हटलंय, मी नेहमी तुझ्याबरोबर असेन. इतके वर्ष एकत्र राहण्यासाठी आणि शानदार क्षण जगण्यासाठी धन्यवाद. तू नेहमी आमच्या हृदयात असशील.अभिनेता जेम्स हॉलक्रॉफ्टच्या मृत्यूमुळे सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे. त्याचा मृत्यू नेमका कसा झाला असा प्रश्न सर्वांना पडला आहे. पण मृत्यूचं योग्य कारण अद्याप समोर आलेलं नाही. दरम्यान अशी माहिती समोर आली आहे की, मेक्सिको सिटीतील तिजापान येथील घरी परतत असताना जेम्स हॉलक्रॉफ्ट गायब झाला होता.जेम्सच्या मृत्यूनंतर मनोरंजन विश्वातील अनेक कलाकारांनी त्याला श्रद्धांजली वाहिली आहे. चाहत्यांनी देखील दु:ख व्यक्त करत, हे एक स्वप्न असावं असं म्हटलंय.जेम्सच्या वर्कफ्रंट विषयी सांगायचं झाल्यास, जेम्सने 'कोमो डाइस एल डिचो'मधील त्याच्या भुमिकेमुळे खूप प्रसिद्धी मिळवली होती. त्याचबरोबर डाइम क्यू सीच्या अकराव्या सीझनमध्येही त्यानं काम करत प्रेक्षकांची मनं जिंकली होती.

### गणेश मंडळांच्या भेटीदरम्यान राज ठाकरेंच्या पायाला दुखापत

दैनिक आपला विदर्भ

**ठाणे/प्रतिनिधी :** मनसे अध्यक्ष राज ठाकरे हे बुधवारी (११ सप्टेंबर) ठाणे दौऱ्यावर होते. या दौऱ्यात ते १५ गणेश मंडळांना भेट देणार होते. मात्र, यादरम्यान गाडीतून उतरताना त्यांच्या पायाला दुखापत झाल्यानं त्यांना दौरा थांबवावा लागलाय. शिवाई नगर, पातलीपाडा आणि बाळकुम तसंच वृंदावन सोसायटी या ठिकाणच्या गणेश मंडळांना भेटी दिल्यानंतर ते उथळसर येथे दर्शनाला जात असताना त्यांच्या गुडघ्याला मार लागला. त्यानंतर त्यांनी थेट शासकीय विश्राम गृह गाठलं. त्याच ठिकाणी डॉक्टरांनाही बोलावण्यात आलं. डॉक्टरांच्या पथकानं तपासणी केल्यानंतर राज ठाकरेंनी आपला पुढील दौरा रद्द केला.

निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महत्वपूर्ण दौरा : विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मनसेनंही आता ठाण्यातून मोर्चेबांधणीला सुरुवात केली आहे. यासाठीच राज ठाकरे हे बुधवारी ठाण्यात आले होते. ठाण्यात येऊन ते चारही विधानसभा क्षेत्रातील गणेश मंडळांना भेटी देऊन गणरायांचं दर्शन घेणार होते. संध्याकाळी राज ठाकरे ठाण्यात आल्यानंतर त्यांनी ठाणे विधानसभा आणि ओवळा-माजिवडा मतदार संघातील गणेश मंडळाना भेटी दिल्या.


# समृद्धी महामार्गावर एकाच रात्री दोन अपघात; एक बर्निंग कारचा थरार

दैनिक आपला विदर्भ

■ देवानंद सानप

**बीबी :** दिनांक ११/ ९ /२४ चे सकाळी ३.३५ वा दरम्यान समृद्धी महामार्ग चैनेज क्रमांक ३११ मुंबई कॅरीडोर वर एक कुटुंब अमरावती वरून मुंबईच्या दिशेने जात असताना दुसरबीड जवळील पेट्रोल पंपाजवळ कार क्रमांक पोलो-MH-04-HU -1076 अचानक गरम होऊन सदर वाहनाने त्वरित पेठ घेतला परंतु कारचालक जयंत विठ्ठलराव बंदिवान वय ३७ वर्ष यांनी समय सूचकता दाखवून कार ताबडतोब समृद्धी महामार्गाच्या बाजूला घेऊन यामधील इतर दोन जण





पूर्वी रितेश जयस्वाल, वय २१ वर्ष व रोहित राजेंद्र सरिया, वय २४ वर्ष अमरावती यांना सुरक्षित खाली उतरले सदर कार चालकाने समृद्धी कंट्रोल रूम यांना फोन द्वारे माहिती दिल्याने तात्काळ महामार्ग पोलीस चे पोलीस उपनिरीक्षक गजानन उज्जैनकर ,पोहेकॉ उदय गीते, विजय आंधळे व महाराष्ट्र सुरक्षा बल चे अमोल जाधव, सचिन सणांनसे घटनास्थळी पोहोचून महामार्गावरील वाहतूक काही वेळासाठी बंद केली. व क्यू आर व्ही टीम दुसरबीड यांनी सदर वाहनावर पाण्याची फवारा मारल्याने आग विझवण्यात आली. तोपर्यंत संपूर्ण कार जळून खाक झाली होती. यामधील सदर कार मधील इसमांचे सर्व बॅगमध्ये भरलेले सामान व महत्त्वाचे डॉक्युमेंट व इतर घरगुती साहित्य जळून खाक झाल्याने खुप नुकसान झाले. व नंतर वाहतूक सुरळीत करण्यात आली व अपघातग्रस्त वाहन बाजूला करण्यात आले.

दुसरा अपघात चैनल नंबर ३३३ नागपूर कॅरीडोरवर वर रात्री १.२० वा. दरम्यान पिकप क्रमांक MH- 17 BY- 2870 चे चालक वैभव माळी वय २४ यांना झोपेची डुलकी लागल्याने समोर जात असलेले आयशर क्रमांक MH 35 -J 3083 ला पाठीमागून धडक देऊन सदर पिकप वाहन आयशरच्या खाली अडकले सुदैवाने यामध्ये कोणीही जखमी झाले नाही.

माहिती मिळताच महामार्ग पोलीस व एम एस एफ जवान यांच्या मदतीने अपघातग्रस्त दोन्ही वाहने बाजूला घेऊन वाहतूक सुरळीत करण्यात आली. व किरकोळ जखमी यांच्यावर डॉक्टर वैभव बोराडे व चालक दिगंबर शिंदे यांनी प्रथमोपचार केला.

# मित्राला भेटायला मुलगी हॉटेलात जात नाही; बलात्कार प्रकरणातील आरोपीची शिक्षा रद्द

दैनिक आपला विदर्भ

**नागपूर/प्रतिनिधी :** आजवर तुम्ही बलात्कारच्या बऱ्याच प्रकरणावर कोर्टाने दिलेल्या निर्णयाबाबत ऐकलं असेल. आता मुंबई हायकोर्टाने असा निर्णय दिला आहे की तुम्हाला आश्चर्य वाटेल. मुलीने अनोळखी मुलासोबत पहिली भेट घेण्याकरिता हॉटेलच्या खोलीत जाऊ नये, असं म्हणत मुंबई उच्च न्यायालयाने बलात्कार प्रकरणातील आरोपीची शिक्षा रद्द केली आहे.

मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात एका बलात्कार प्रकरणाची सुनावणी झाली. तेव्हा कोर्टाने आरोपीला या प्रकरणात दिलासा दिला आहे. राहुल



लहासे असं त्याचं नाव.

नेमकं प्रकरण काय?

आरोपी राहुल लहासे याची पीडित मुलीसोबत फेसबुकच्या माध्यमातून ओळख झाली. त्यानंतर त्याने तिला भेटायला हॉटेलमध्ये बोलावलं. मुलगी तेव्हा बारावीत शिकत होती. मुलगी हॉटेलमध्ये गेल्यावर राहुलने मुलीशी शारीरिक संबंध ठेवले आणि मुलीचे आक्षेपार्ह फोटोही काढले. काही दिवसांनंतर त्यांची मैत्री तुटली. तेव्हा मुलाने तिचे ते फोटो फेसबुकवर टाकले. तसंच मुलीच्या होणाऱ्या नवऱ्यालाही पाठवले.

यानंतर ऑक्टोबर २०१७ मध्ये पीडितेने आरोपीविरोधात अंजनगाव-सुर्जी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. सत्र न्यायालयात या प्रकरणाची सुनावणी झाली. सत्र न्यायालयाने आरोपीला १० वर्षांची शिक्षा दिली.

**मुंबई हायकोर्टाने रद्द केली शिक्षा**

नंतर हे प्रकरण मुंबई हायकोर्टात गेलं. सत्र न्यायालयाने आरोपीला दिलेली १० वर्षांची शिक्षा मुंबई हायकोर्टाने रद्द केली.

बलात्काराचा आरोप करणाऱ्या मुलीने जे काही सांगितलं ते कोर्टाने अमान्य केलं. मुलीने अनोळखी मुलासोबत पहिली भेट घेण्याकरिता हॉटेलच्या खोलीत जाऊ नये, असं हायकोर्टाने सुनावणीवेळी म्हटलं.

# फसवणुकीचा आरोपी प्राध्यापक वीस महिन्यांपासून घेतो पूर्ण वेतन, कारवाई शून्य

दैनिक आपला विदर्भ

**नागपूर/प्रतिनिधी :** राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठातील सात प्राध्यापकांची आर्थिक फसवणूक प्रकरणातील आरोपी जनसंवाद विभागाचे प्राध्यापक डॉ. धर्मेश धवनकर तब्बल वीस महिन्यांपासून सक्तीच्या रजेवर असून पूर्ण वेतन घेत आहे. मात्र, या प्रकरणात अद्याप कुठलीही कठोर कारवाई झाली नसल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे. विशेष म्हणजे, धवनकर यांच्याविरोधातील तक्रार मागे घेणाऱ्या चार तक्रारकर्त्यांवर अधिसभा सदस्यांनी मागणी केल्यानंतरही कार्यवाही झाली नसल्याने प्रशासनाच्या दिरंगाईवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.

**माघार घेणाऱ्यांची चौकशी नाही?**

तक्रार मागे घेणाऱ्या या चार प्राध्यापकांची फसवणूक झाल्यामुळे विद्यापीठाने धवनकर यांना सक्तीच्या रजेवर पाठवले. तसेच प्राथमिक व विभागीय चौकशीही लावली. मात्र, आता त्यांनीच माघार घेतल्याने या प्राध्यापकांचीच चौकशी करावी, अशी माहिती काही अधिसभा सदस्यांनी केली होती. मात्र, पुढे काहीही झालेले नसल्याची माहिती आहे.

प्रकरण काय?

सात उच्चपदस्थ विभागप्रमुखांकडून लैंगिक छळाच्या बनावट तक्रारीची भीती दाखवून लाखो रुपयांची खंडणी वसूल केल्याचा आरोप असलेल्या डॉ. धवनकर यांच्या पराक्रमाने संपूर्ण शैक्षणिक क्षेत्राला हादरवून सोडले होते. हे सात प्राध्यापक धवनकर यांच्या जाळ्यात कसे सापडले, त्यांच्यावर कुठला दबाव होता, असे अनेक प्रश्न उपस्थित केले जात होते. धवनकर प्रकरणाच्या प्राथमिक चौकशीसाठी नेमण्यात आलेल्या निवृत्त न्यायाधीश अजय चिंतामण चाफले यांच्या समितीने आपला अहवाल तत्कालीन कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांना सोपवला होता. चाफले यांनी सातही तक्रारकर्त्यांना बोलावून त्यांचा जबाब नोंदवला. तक्रारकर्ते शेवटपर्यंत आपल्या तक्रारीवर ठाम होते. त्यांनी धवनकर यांनी कशी फसवणूक केली याची संपूर्ण माहिती दिली. प्राथमिक चौकशी समितीने धवनकर यांची विभागीय चौकशी करावी, अशी शिफारसही केली. त्यामुळे



निवृत्त जिल्हा न्यायाधीश समीर दास यांच्या समितीने धवनकर प्रकरणाची चौकशी केली.

प्रकरणाला नवे वळण

यानंतर आता ज्या चार प्राध्यापकांची फसवणूक होऊन त्यांनी पैसे दिल्याची तक्रार केली होती त्यांनीच दोन्ही पक्षांमध्ये सहमतीने माघार घेत असल्याचे कबूल केले. असेच आता कुठलेही आर्थिक देणे-घेणे नाही असेही लिहून दिले. त्यामुळे या प्रकरणाला नवे वळण आले होते. मार्च महिन्यात झालेल्या अधिसभेच्या बैठकीत विभागीय चौकशीमध्ये धवनकर अनेकदा अडथळा आणत असल्याचे सांगण्यात आले होते. मात्र, वीस महिन्यांपासून या प्रकरणावर ठोस कारवाई न झाल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे. यासंदर्भात विचारणा करण्यासाठी कुलसचिवांशी संपर्क साधला असता होऊ शकला नाही.

# उपविभागीय अधिकारी यांनी केली गणेश विसर्जन मार्गाची पाहणी

दैनिक आपला विदर्भ

■ देवानंद सानप

**सिंदखेडराजा :** तूच सुखकर्ता तूच दुःखहर्ता अवघ्या दीनांचा नाथा बाप्पा मोरया रे बाप्पा मोरया रे चरणी ठेवितो माथा. याप्रमाणे गणरायाची स्थापना घरोघरी करण्यात आली आहे.. गणरायाचे आगमन होताच प्रशासन सुद्धा नागरिकांना कुठल्याही अडचणीचा सामना पडता कामा नये म्हणून खबरदारी घेत असतात.

सिंदखेड राजा येथे उपविभागीय अधिकारी यांनी सिंदखेड राजा मधील सार्वजनिक गणेश विसर्जन मार्गाची पाहनी केली. राजे लखोजीराव यांच्या राजवाड्यापासून या पाहणी दरम्यान त्यांच्यासोबत नगरपरिषदेचे मुख्याधिकारी प्रशांत व्हटकर, महावितरणचे कर्मचारी



उपस्थित होते. या पाहनी दरम्यान उपविभागीय अधिकारी यांना काही ठिकाणी विद्युत वाहिनीच्या तारा खाली लोमकळलेल्या दिसल्या त्या दुरुस्त करण्याच्या सूचना महावितरण कर्मचारी यांना दिल्या. तसेच काही ठिकाणी स्वच्छता करण्याचे आदेश सुद्धा उपविभागीय अधिकारी प्रा. संजय खडसे यांनी प्रशासनांला दिले .आनंद, उत्साह आणि भक्तीभावाच्या वातावरणात, व पर्यावरण पूरक गणेशोत्सव आपण सर्वजण या उत्सवात सहभागी होऊन आनंदाची उधळण करुया असे आवाहन उपविभागीय अधिकारी प्राध्यापक संजय खडसे यांनी केले.

# गिरडा परिसरात ५ वा बिबट्या अडकला वन विभागाच्या पिंजऱ्यात

## गोरेवाडा प्राणी संग्रहालयात केले रवाना

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** एका शेतकऱ्यावर हल्ला करून बिबट्याने ठार केल्याची घटना मागील पंधरवाड्यात गिरडा गावाजवळ घडली होती. यानंतर वन विभागाने तात्काळ दाखल घेत गिरडा गावाजवळ २ पिंजरे लावून ३ पथके स्थापन करून जनजागृती करत वन कर्मचाऱ्यांची गस्त वाढवली होती. वनविभागाने लावलेल्या या पिंजऱ्यात आज १२ सप्टेंबर रोजी सकाळी १०:३० वाजेच्या सुमारास एक मादी बिबट अडकली आहे. या बिबट्याला नागपूर येथील गोरेवाडा प्राणी संग्रहालयात रवाना करण्यात आल्याची माहिती बुलढाणा एसीएफ अश्विनी आपेट यांनी दिली आहे.

बुलढाणा तालुक्यातून अजिंठा पर्वतरांग जाते.या पर्वतरांगेवरच गिरडा हे गाव वसलेले आहे.आजूबाजूला घनदाट जंगल असल्याने या परिसरात गावकरी व शेतकऱ्यांना नेहमी बिबट,अस्वल, तडससारख्या हिंस्त्र प्राण्यांचे दर्शन होत असते. मागील काही काळात मानव-प्राणी संघर्ष सुद्धा पाहायला मिळाले.मागील २९ ऑक्टोबर रोजी गिरडा जवळ शेतात काम करणाऱ्या सुभाष जाधव या शेतकऱ्यावर बिबट्याने हल्ला केला व उचलून जंगलात नेले होते. या घटनेत शेतकऱ्याचा दुर्दैवी मृत्यू झाला होता. परिसरातील नागरिक व शेतकरी या घटनेमुळे भयभीत झाले होते व वनविभागाच्या प्रति त्यांच्या मनात रोष पाहायला मिळत होता.अशात वन विभागाने गिरडा गावाजवळ २ पिंजरे लावले होते यापैकी एका पिंजऱ्यात आज गिरुवारी सकाळी रक मादी बिबट अडकली आहे.त्याला गोरेवाडा प्राणी संग्रहालयात रवाना केले जाणार.मागील २ महिन्यात बुलढाणा वन विभागाने गिरडा परिसरातून आज पर्यंत एकूण ५ बिबट्यांना पकडले आहे. यापैकी ३ बिबटे अंबाबारवा अभयारण्यात सोडण्यात आले तर २ बिबट्यांना नागपूर येथील गोरेवाडा प्राणी संग्रहालयात सोडले.





**वन विभागाला गिरडा ग्रामस्थांची भक्कम साथ**

गिरडा गावाजवळच बिबट्याने हल्ला करून एका शेतकऱ्याला ठार केले आहे. अशी घटना पुन्हा घडू नये यासाठी वन विभागाने सतर्क होऊन कामाला सुरुवात केली आणि वन विभागाच्या मदतीला समस्त गिरडावासी धावून आले. त्यामुळे आतापर्यंत वन विभागाने गिरडा परिसरातून मागील २ महिन्यात ५ बिबट्यांना सुरक्षितरित्य पकडून इतरत्र हलविले आहे.डीएफओ सरोज गवस,एसीएफ अश्र्विनी आपेट,आरएफओ अभिजित ठाकरे यांच्या मार्गदर्शनात वनपाल एस. डी.वानखेडे,वनरक्षक प्रदीप मुंडे तसेच वनकर्मचारी परिसरात काम करीत आहे.

**बिबट्याच्या हल्ल्यात शेतकरी ठार झाल्यानंतर वन विभागाने गिरड परिसरात जनजागृती सोबत वन कर्मचाऱ्यांची गस्त वाढवलेली आहे तसेच बिबट्यांना पकडण्यासाठी दोन पिंजरे लावलेले होते यात मागील दोन महिन्यात पाच पिते काही झाले. मानव प्राणी संघर्ष होऊ नये यासाठी वन विभागाद्वारे उचित पाऊल उचलले जात आहे.**

**अश्विनी आपेट**
**एसीएफ,बुलढाणा**